शोधपत्र

March, 2010

# जातक कथेतून दिसणारी अर्थव्यवस्था

## ( सोळा महाजन पदे: बौद्धकालखंड )ह्य

* डॉ. हरी नारायण जमाले.

*प्राचार्य राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथ्री, औरंगाबाद

प्राचीन भारताच्या इतिहासात इ.स. पूर्व 6 व्या शतकाला महत्वाचे स्थान आहे. उत्तर वैदिक काळापासून आर्यांच्या सांस्कृतिक प्रसाराला सुरुवात झाली. राजकीय क्षेत्रात प्रभावी ठरणारी महाजनपदे उदयाला आली. त्यात काही राजे शक्तीषाली होती तर काही राजे कमकुवत होती. बलाढ्य राज्यांच्या आक्रमणामुळे काही राज्यांना अस्तित्व गमवावे लागले. या सत्तेच्या स्पर्धेतूनच काही राज्य विस्तारित होत गेली. त्यामध्ये मगधचे रुपांतर साम्राज्यात झाले. सांस्कृतिक, अध्यात्मिक व वैज्ञानिक क्षेत्रात व कालखंडात अलौकिक भर पडली. जैन धर्माच्या प्रसाराला याकाळात चालना मिळाली. गौतम बुद्धाने बुद्ध धर्माची स्थापना केली. यज्ञीय, कर्मकांड, औपनिशधीके, गहन तत्वज्ञानामुळे संभ्रमीत झालेल्या समाजाला केवळ सदाचरण, नैतिकता व मानवतेच्या आदर्षवादी विचारांची षिकवण देण्याचे कार्य बौद्ध धर्माने केले. त्यामुळे या लोकांचा विकास झाला. इ.स.पूर्व सहाव्या शतकापासून तर मौर्यकालखंडापर्यंत या काळाला बौद्धयुग म्हणून संबोधले जाते. याच कालखंडास इ. स.पु. 600 ते इ.स.पु. 322 अर्थव्यवस्थेत महत्वाचा बदल घडून आला तो म्हणजे लोखंडाचा शोध, तांदुळ, उस, कापूस यांची लागवड झाली. सर्वात महत्वाची अर्थव्यवस्थेत भर म्हणजे देषांतर्गत व इतर देषांषी सुरु झालेला व्यापार होय. सर्व सामान्यांची अर्थव्यवस्था प्रगत होती असे दिसते.

**ग्राम** : जैन आणि बौद्ध काळात आर्थिक जीवनात ग्राम हेच आधारषिला होते. गाव तलाव किंवा विहीरीजवळ वसलेले असत. छोटमोठी वक्ष हीच गावची संपत्ती असत. प्राचीन काळी गावांना तर बंदी होती. गावात सभाभवन असत. तेथे परदेषी लोक उतरत असत. यांचे जातक कथेमध्ये वर्णन केले आहे.

**शेती** : जमीनीवर राजाची मालकी असत. 1/6 ते 1/12 भाग उत्पादन कर रुपाने आकारीत असे. शेतकरी स्वतंत्र होते व त्यांच्या जमीनीवर वास्तविक अधिकार होता. या जमीनीवर ते स्वत: काम करीत असत. शेतीची विभागणी केली जात असे. संयुक्त कुटूंब पद्धती होती. कुटूंबाचे विभाजन झाले असता या जमीनीचे तुकडे होत असे. जातक कथेत हजार 'करीसा' (कोस) जमीन ब्राह्मणांनी लागवडीखाली आणल्याचे वर्णन आहे. म्हणजेच अर्थव्यवस्थेत शेतीचा अतिषय महत्वाचा वाटा आहे.[1]

**करपद्धती** : जातक कथेतील अर्थव्यवस्थेत कर पद्धतीला महत्वाचे स्थान आहे. जमीन व जंगले ही राज्यांच्या अधिकाराखाली असे. राजाला पुत्रप्राप्ती झाल्यास अनेक भेटवस्तू दिल्या जात असत. या वस्तू आल्यामुळे मोठ्य प्रमाणात धनप्राप्ती होत असे. आपल्या जमीनीवर काम करण्यासाठी बिनपगारी (वेठबिगारी) मजूरांचा वापर केला जात असे. शेतसारा वसुल करण्याचे काम 'ग्रामभोजक' / 'महामात्र' करीत असत. करपद्धतीही राज्यांच्या वैयक्तिक मनावर असत. जमीनदान करण्याची पद्धत मगध राज्यात होती. जमीन विकल्याचे वर्णन कोसल राज्यात आहे. कर्जाच्या बोज्यामुळे शेतकरी जमीन विकत असत. मजूर म्हणून मोठे शेतकरीही काम करीत असत. त्यांना 'महीका' म्हणत असत. असे वर्णन जातक कथेत मिळतात.[2]

**पशुपालन** :बौद्ध काळाचे अहिंसा तत्वामुळे शेतीच्या प्रगतीसाठी आवष्यक असलेल्या पषुधनाचे संरक्षण होण्यास मदत झाली. जनावरांमुळे धनधान्य प्राप्ती होत असल्यामुळे त्यांची हिंसा करु नये असे बौद्ध ग्रंथात म्हटले आहे. वेद वाङमयातील गो हत्येसंबंधी अनेक दाखले लक्षात घेता आर्थिकदृष्ट्या ही विचारसरणी स्वागतार्ह मानली पाहिजे.

**उद्योगधंदे** : कृषी हा आर्थिक जीवनाचा मुळ आधार होता. याला पूरक असे उद्योगधंदे व इतरही उद्योगधंदे समाजात प्रचलित होते. त्यामुळे आर्थिक जीवन संचलित होत असे.

**कापडउद्योग** : कापसाचे अधिक उत्पादन होत असे. कापसापासून कापड तयार केला जात असे. पाली ग्रंथावरुन बौद्ध काळात कापसाचा सर्वसामान्य वापर सुरु झाला असावा असे दिसते. शहरांकडून खेडे गावांना अन्नधान्याच्या बदल्यात कापड मिळत असे. कारण बनारसच्या आजूबाजूच्या गावात कपाषीचे उत्पादन केले जात असे व बनारस येथे कापड बनविले जात असे. कापड हा व्यवसायाचा एक महत्वाचा घटक असल्याने कापडाचे उत्पादन करणे त्यासाठी लागणा—या विविध उपकरणांचे व साधनांचे उत्पादन होत असे.[3]

**धातू उद्योग** : लोखंडांच्या वापराचे ज्ञान व घिसड्यांच्या भात्यांचा वाढता प्रसार ही आर्थिक प्रगतीची तांत्रिक कारणे होती. नांगराचा फाळ तापवावा लागत असे. यावरुन भाते अस्तित्वात

नसावे या काळात 'षाली' म्हणून संबोधले जाणारे निरनिराळ्य जातीचे भात व उस यांच्या लागवडीसाठी जमीन खोलवर नांगरण्याची आवष्यकता होती व त्यासाठी नांगराच्या फाळाला धार लावण्याची गरज होती. शेती दोनदा किंवा तीनदा नांगरली जात असे. पाणिनीने म्हटले आहे. दळणवळणाच्या साधनात सुधारणा झाल्यामुळे व्यापाराला चालना मिळाली. अषी माहिती जातक कथेत मिळते. याकाळात लोखंडी अवजारांचा व्यापार होत होता. इ.स.पूर्वी सुमारे 5 व्याशतकात हिरोडोटसने इराणचा शहा 'झेरेक्स' यांच्या सैन्यांनी लोखंडी टोकाचे बाण वापरलेले संदर्भ सापडतात.[4] यावरुन याकाळातच लोखंड व पोलादाचा व्यापार निष्चित सुरु झाला असावा असे दिसते. म्हणजेच धातू उद्योग अर्थव्यवस्थेत महत्वाचा मुद्दा होता.

**सुतारकाम** :लाकडापासून बैलगाडी, रथ, शेतीसाठी लागणारे अवजारे, घरकाम करण्यासाठी खांब, घरांसाठी दरवाजे व त्यावर कलात्मकरित्या सजावट करणे व त्याची योग्य पद्धतीने बांधणी करणे यांचा समावेष सुतार कामात होतो.

**चर्मोद्योग** :कातड्यापासून जोडे, वाहना, चप्पल व विविध उपयोगी वस्तू तयार करण्यात येत. तसेच पाणी आणण्यासाठी परवाली तयार करण्यात येत. तसेच शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी मोटीचा वापर होत असे. ह्या मोटी चामड्यापासून चर्मकार बनवित असत. खोड्याच्या पाठीवरील खोगीर चामड्यापासून तयार केले जात. यामुळे अर्थव्यवस्था ही बळकट होत गेले असे वर्णन प्राचीन भारतीय जातक कथेत आहे.[5]

**कुंभकार** : एका प्राचीन ग्रंथात 'सदलपुत्र' नामक कुंभाराचे वर्णन केले आहे. त्यांच्या जवळ 500 कुंभार कामासाठी होते. ते नावेच्या साहायाने गंगेच्या खोऱ्यात आपला व्यापार करीत असत. यात प्रामुख्याने मातीची भांडी, विविध आकाराच्या मुर्त्या तसेच घरातील अनेक शोभिवंत वस्तू ज्या सजावटीसाठी वापरत असत ह्या वस्तू हे कुंभकार अत्यंत कलात्मक व आकर्षकपणे बनवित असत. या कुंभारांची एक श्रेणी अस्तित्वात होती.

**जहाज बांधणी उद्योग** :नदी व समुद्रमार्गे व्यापार चालत असे. यात प्रामुख्याने गंगेच्या खोऱ्यात व्यापार जोरात चालत असे. यासंबंधी उल्लेख 'मिलींद पन्हो' मध्ये सापडतो. तसेच चीन, सयाम, ब्रम्हदेष यांच्याषी व्यापार समुद्रमार्गे होत असे. ताम्रपर्णी, मृगुकच्छ बंदरात जहाज बांधणीचा व्यवसाय चालत असावा. तसेच छोट्या नावा व झेंड्यांची बांधणी गंगेच्या खोऱ्यात होत असे[6]

**व्यापार वाणिज्य** : एक हजार वर्षाच्या काळानंतर व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. बौद्ध काळात व्यापार हा आर्थिक जीवनाचा पाया होता. जातक कथेतील उल्लेखावरुन शेतकऱ्यांकडून धान्य व व्यापाऱ्यांकडून वस्तू खरेदी करुन व्यापारी स्वतः देष विदेषात जावून विकत असत व त्यापासून नफा मिळवत असे. बनारस हे व्यापारी केंद्र होते. चल्लूक सेश्ठी नावाच्या जातक कथेत शंभर व्यापाऱ्यांना जहाजातून आलेला माल विकत घेतानाचा उल्लेख आहे. तसेच हस्त पप्डर जातकामध्ये जहाज बुडुन 500 व्यापारी मेल्याचा उल्लेख आहे. यात हे व्यापारी कोणत्या संघाचे किंवा श्रेणीचे नसून ते सहयोगी होते. जहाजांच्या सुविधेनुसार ते एकत्र व्यापार करत असत. कारण चोर आणि लुटेरे यांच्यापासून संरक्षणासाठी तसेच जेवण्यासाठी एखाद्या विपरित स्थळी अडचणी उदभवू नये म्हणून ते एकत्र उतरत व राहत असत. कुट वाणिज्य व महावाणिज्य या जातकात भागेदारीत चालणाऱ्या व्यापाराविषयी उल्लेख आढळतात.[7]

**व्यापारी मार्ग** :स्थल आणि जल या दोन्ही मार्गाने व्यापार चालत असे. राईस डेविडस यांच्या मते उत्तरेकडून दक्षिण – पष्चिमेकडे जाणारा मार्ग श्रावस्ती वरुन पैठण पर्यंत एक मार्ग होता. यात महिश्यती, उज्जैन, विदीषा, कोषंबी तसेच साकेत इ. नगरे लागत असत. तर उत्तरेकडुन दक्षिणपूर्व जाणारा मार्ग श्रावस्ती ते राजगष्ह पर्यंत होता. त्यात कपिलवस्तू, कुषीनगर, पावा, वैषाली, पाटलीपुत्र इ. नगरे लागत. हा मार्ग गया पर्यंत जात असावा. यात विदेहपासून गांधारपर्यंत मगध पासून सौबीर पर्यंत मृगच्छक पासून ब्रह्मदेषापर्यंत, बनारसपासून गंगा नदीमार्गे ब्रह्मदेषापर्यंत असे अनेक मार्ग अस्तित्वात होते. चीनषी असलेल्या व्यापाराचे वर्णन 'मिलींद पन्हो' यात आढळते.

**देशांतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार** :आंतरराष्ट्रीय व्यापार व देषांतर्गत व्यापार या काळात प्रगत होता. त्या व्यापारात रेषीम, मलमल, शास्त्रा, पीन, जरीचे वस्त्र, औषधी, मलम, लेप, हस्तीदंती वस्तू, आभुषणे इ. वस्तूंचा व्यापार होता असे वर्णन जातकात आढळते. व्यापार स्थलमार्गे बैलगाडीने होत असे. तसेच जलमार्गे नावा, होड्या, जहाज यांच्याद्वारे व्यापार होत होता. हा व्यापार थोडा कमी खर्चिक होता.[8]

**श्रेणी** : बौद्धकाळातील आर्थिक जीवनाचा पाया म्हणजे श्रेणी होय. उद्योग हे श्रेण्यांच्या स्वरुपात संघटीत होते. 18 उद्योग श्रेण्यांबरोबर डाकू–चोर यांच्याही श्रेण्या आढळतात. प्रत्येक श्रेणीला स्वतंत्र प्रमुख असत. स्वतंत्र कायदे असत. बुद्ध जन्माच्या दोन गोष्टीमध्ये निघालेल्या मिरवणुकीत सर्व 18 श्रेणींनी भाग घेतला होता असे म्हटले. त्यावरुन त्या सर्वांवर राजाचा सर्वसाधारण अधिकार असावा असे सुचविले जाते. 'बहुदा' 'भांडागरिक' म्हणजे बनारस येथील कोषाध्यक्ष राजाच्या वतीने सर्व कारागीरांच्या समुहावर देखरेख करीत असावा. उद्योग व व्यापार यांची जवाबदारी शहरात राहणाऱ्या सेठींकडे असे व ते ग्रामीण भागातील सेठींषी संपर्क ठेवण्याचे कार्यही करीत असत. सेठींमध्ये उच्चवर्णीय असे भिन्न वर्ग असत व सेठी हे राजाने दिलेल्या मानाचा किताब होता[9]

**श्रेणीचे अधिकार** : काही श्रेण्यांना निजी सेना ठेवण्याचा अधिकार होता. ज्यावेळी राजाला आवष्यकता भासेल त्यावेळी ती राज्याच्या सेवेत हजर राहत असत. श्रेणी व्याजासहित कर्ज देण्याचे कार्यही करत असे. परंतू बौद्ध काळात व्याजदर काय होता याबद्दल निष्चितता नाही. डॉ.पीक यांच्या मतानुसार श्रेणी दरबारात व्यापाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करीत असे. सामाजिक व आर्थिक क्षेत्रात श्रेणींना विषेष महत्व प्राप्त झाले होते. आर्थिक क्षेत्रात मुल्य निर्धारणाचे कार्य श्रेष्ठी करत. उद्योगांना प्रचलित करणे,

बँक व इस्टचे कार्य करणे यामुळे श्रेणींचा आर्थिक जीवनात प्रमुख हात अनिवार्य होता.[10]

**चलन व्यवस्था** : व्यापारात वस्तू विनिमयाची पद्धत बंद झालेली नव्हती. नाणी प्रचारात येण्यास प्रारंभ झाला होता. या काळातील चांदीची व तांब्याची विविध आकारातील नाणी प्राप्त झाली आहेत. ज्यांच्या वजनात बरीच एकता दिसून येते. त्यांच्यावर कोणत्याच प्रकारचे लेख नाहीत. छापे उमटवलेले आहेत. इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापूर्वी लेख असलेले नाणे प्रचलित नव्हते. इ.स.पूर्व 600 या काळात काहीजण (कार्षापण) नावाचे तांब्याचे नाणे प्रचारात आले होते. त्याचे वजन 146 ग्रेन इतके होते. श्री. दुर्गाप्रसाद यांच्या मतानुसार मुद्रांच्या एका बाजूला सुर्य–धनुश्यबाणाचे टोक, बैल, मोर, कुत्रा, वृक्ष, जंगली हत्ती, बारंहसिंगा (काळवीट) इ. छापे असत तर दुसऱ्या बाजूस नाणी प्रचलनास आणलेल्या शतकाचे अधिसुचक चिन्ह आहेत.[11] तसेच नाण्याची शुद्धता व वजन निदर्षक करणाऱ्या शराफांचे असावेत. इ.स.पूर्व सातवे शतक मुल्य निर्धारणाचा उल्लेख आढळतो. या काळात चलनास इतके महत्व प्राप्त झाले होते की, मेलेल्या उंदराची किंमतही पैषांच्या स्वरुपात सांगितली जात असे. सेंठी किंवा आठ कोटींची संपत्ती असणारे नगरवासियांचे उल्लेख आढळतात. पैसे कर्जाऊ देण्याची पद्धत अस्तित्वात होती.

**नगरे (नागरीकरण)** :नागरी अर्थव्यवस्थेचा विकासही मौयपूर्व काळातील एक विषेष बाब माणता येईल. सुमारे एक हजार वर्षानंतरही प्रथा भारतात परत प्रसारित झालेली दिसते. भिक्षूने मागण्याच्या संदर्भात जैन निती शास्त्रात खुले शहर, मातींची वेस असलेले शहर, मोठे शहर, वसाहतींपासून दूर असलेले शहर, समुद्रकिनाऱ्या वरील गांव व राजधानीचे शहर असे नागरी वस्तींचे निरनिराळे प्रकार सांगितले आहेत. तसेच ॲलेक्झांडरने जेंव्हा ॲरिस्थेब्युलसला सिंधू नदीचे पात्र अधिक पुर्वेकडे गेल्यामुळे निर्मनुश्य झालेल्या प्रदेषात काही कामगिरीवर पाठविले तेंव्हा एकेकाळी मनुश्यवस्तीने गजबजलेल्या शहरांकडून अधिक शहरांचे व व्यक्तींचे अवषेष त्याला दिसले असेही सांगण्यात येते. दुर्दैवाने सिंधू नदीच्या खोऱ्यातील या शहरांचे अद्यापी उत्खनन करण्यात आलेले नाही. संपूर्ण देषाचा विचार करता पुर्वेकडील चंपा हे पष्चिमेकडील कपिलवृक्षपर्यंतचा प्रदेषात पट्टणपासून उत्तरेकडे कपिलवृक्षपर्यतच्या प्रदेषात या काळात साठ प्रसिद्ध शहरे होती असे माणन्यात येते. श्रावस्ती सारखी 20 मोठी शहरे असून त्यापैकी सहा शहरे ही तेथेच महानिर्वाण झाली असावी असे माणन्याइतकी महत्वाची गणली जात असे. चंपा, राजगृह, साकेत, कौषंबी, बनारस व कुषीनारा ही ती शहरे होत.[12]

**गुलामगिरी (दासप्रथा)** : समाजात वेगवेगळ्या प्रकारचे दास जीवन जगत असत. त्यामध्ये युद्धामध्ये हारलेले सैनिक दास बनले असत. कर्जदार दास, स्त्रिया व मुले यांनाही दासी किंवा दास रुपाने विकले जाई. पुढे त्यांची मुले दास म्हणूनच जन्माला येत असत. त्यावेळी तीन प्रकारचे दास होते. 1) दासापोटी जन्मलेले 2) विकत घेतलेले किंवा दान दिलेले 3) गुलामाच्या घरी जन्मलेले व्यापाराकरिता सेवकांची, मजूरांची आवष्यकता होती व व्यापारी वर्गाचा बौद्ध धम्माला पाठींबा असल्यामुळे बुद्धानेही गुलामगिरी प्रथेला विरोध केलेला नसावा.

**समारोप** : इ.स.पूर्व सहाव्या शतकाचा मागोवा घेतला असता असे दिसते की, हे शतक एक प्रगतीपर्व शतक होते. या काळात गौतम बुद्धाच्या तसेच भगवान महावीरांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव जनतेच्या मनावर पडलेला दिसतो. याच काळात लोखंडाच्या वापराचा शोध व प्रसार झाला. ज्ञानाने भारताच्या अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात परिवर्तन आले. जातक कथेत अर्थव्यवस्थेबद्दल मोठ्या प्रमाणावर माहिती मिळते. याच काळात राजकीय स्थैर्य निर्माण झाले. याचा फायदा अर्थव्यवस्था विकसित होण्यास झाला. जनतेला सुरक्षिततेची हमी मिळाली.

## संदर्भ ग्रंथ

1) प्राचीन भारत का सांस्कृतिक, राजकीय तथा आर्थिक इतिहास – आर.एस.षर्मा 2) कित्ता. 3) प्राचीन भारताचा इतिहास – डॉ. रा.श्री.मोरवंचीकर. 4) डी.एन.झा – प्राचीन भारत का इतिहास, राजकमल प्रकाषन, दिल्ली विष्वविद्यालय, दिल्ली 2003. 5) कित्ता. 6) रोमीला थापर – भारत का इतिहास, राजकमल प्रकाषन, नई दिल्ली. पटना 1975. 7) कित्ता. 8) आर.एस.षर्मा – प्राचीन भारतीय अर्थव्यवस्था व अर्थव्यवस्था यावर प्रकाष झोत. 9) कित्ता. 10) डी.डी. कोसंबी – प्राचीन भारत का इतिहास और संस्कृती. नई दिल्ली 1965. 11) आर. एस. षर्मा – प्राचीन भारताचा इतिहास. (NCERT) 12) प्राचीन भारत का सांस्कृतिक, राजकीय तथा आर्थिक इतिहास – आर.एस.षर्मा 13) प्रा.प्र. का.चौधरी – प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती.